# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/०७/२०२६ (गुरूवार )

## मौदा पोलिसांकडुन घरफोडी प्रकरणात दोन दिवसांत अंतिम अहवाल सादर;दोन विधी संघर्ष बालकांना दोषसिद्धी

नागपूर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत मौदा पोलीस स्टेशन येथे दाखल घरफोडीच्या गुन्हयाचा जलद गतीने तपास करून न्यायालयात भक्कम पुरावे सादर केल्याने दोन विधी संघर्ष बालकांना दोषसिद्धी झाली आहे.

दिनांक १५/०७/२०२६ रोजी मध्यरात्री अज्ञात आरोपींनी मौदा येथील शिवाजी चौक परिसरातील आयुषी मोबाईल शॉपी चे कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला. आरोपींनी दुकानातील मोबाईल, लॅपटॉप व इतर साहित्य असा ५८,१००/— किंमतीचा मुद्देमाल चोरी करून नेला. सदर प्रकरणी फिर्यादी श्री. विशाल शालीकराम फंदी, वय ३१ वर्षे, रा. पावडदौना, ता. मौदा, जि. नागपूर यांच्या तक्रारीवरून मौदा पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक ४९८/२०२६ अन्वये कलम ३३१(४), ३०५ (अ) भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. मौदा पोलीसांनी सदर गुन्हयाची तात्काळ उकल करून सदर दोन्ही विधी संघर्ष बालकांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सारीन दुर्गे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी पोलीस हवालदार श्री गणेश मुदमाळी आणि गुन्हे शोध पथक यांनी त्यांच्या ताब्यातून गुन्हयात वापरण्यात आलेली मोटारसायकल तसेच चोरीस गेलेला मुद्देमाल असा एकूण ९८,५००/— किमतीचा माल जप्त केला होता.

तपास अधिकारी यांनी सखोल तपास करून तपास पूर्ण करून अवघ्या दोन दिवसांत अंतिम अहवाल (**Final Report**) बाल न्याय मंडळ, नागपूर येथे दाखल करण्यात आला.

**खटल्याच्या जलद सुनावणीनंतर न्यायदंडाधिकारी मा. श्रीमती बी. एम. कोठावळे व मा. श्री. व्ही. आर. पांढरे, बाल न्याय मंडळ, नागपूर यांनी दोन्ही विधी संघर्ष बालकांना आर्थिक दंडाची शिक्षा सुनावली आहे.**

## पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत सराईत गुन्हेगार रितीक रमेश खोब्रागडे याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन रामटेक :—** पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत अभिलेखावरील सराईत आरोपी नामे **रितीक रमेश खोब्रागडे, वय २५ वर्ष, रा. पटगोवारी, ता. रामटेक, जि. नागपूर** याचे विरूध्द **शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे, महीला अत्याचार गुन्हे, मोटर सायकल चोरी करणे, अश्लील शिवीगाळ करुन खोडसाळपणा करणे, दुकानात बेकायदेशीर प्रवेश करुन सामानाची तोडफोड करुन नुकसान करणे व अश्लील शिवीगाळ करुन मारहाण करुन जिवाने मारण्याची धमकी देणे** यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते , उपविभागिय पोलीस अधिकारी,रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेक पोलीसांनी एमपीडीए कायदयान्वये कारवाई केली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी २३/०७/२०२६ रोजी सराईत गुन्हेगार रितीक रमेश खोब्रागडे, वय २५ वर्ष, रा. पटगोवारी, ता. रामटेक, जि. नागपूर याचे विरूध्द स्थानबध्दतेचा आदेश काढला असता रामटेक पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला तात्काळ ताब्यात घेवुन जिल्हा कारागृह नागपुर येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.**



**सराईत गुन्हेगार रितीक रमेश खोब्रागडे**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, १ लाख १५ हजार ७३० रूपयांचा मूद्देमाल जप्त, १ आरोपी अटक
## उपविभागिय पोलीस अधिकारी,कार्यालय उमरेड आणि उमरेड पोलीसांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २१/०७/२०२६ रोजी उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी महीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात उमरेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी संयुक्त कारवाई करत उदासा गावाच्या रोडवर सापळा रचला असता आरोपी पवन केशव वाघमारे, वय ३० वर्ष, रा. पिराया पोस्ट सेव, ता. उमरेड हा इलेक्ट्रीक ओला दुचाकी क्र एम एच ४० डी के ५८७९ सह मिळुन आला. पंचासमक्ष झडती घेतली असता

त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्षएकुण वजन ५.२०० किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १०,७३०/— रूपये, इलेक्ट्रीक ओला दुचाकी किंमती १,००,०००/—रूपये आणि एक मोबाईल असा एकुण १,१५,७३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी पवन केशव वाघमारे, वय ३० वर्ष, रा. पिराया पोस्ट सेव, ता. उमरेड यांचेविरूद्ध पोस्टे उमरेड येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक केली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, वेलतूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वेलतूर** :— दिनांक २२/०७/२०२६ रोजी वेलतूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने एक इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा वेलतूर ते रत्नापुर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक होंडा शाईन १२४ मोटरसायकल क्र. एम एच—४०/डी के—७४२४ ने जातानी मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू च्या २०० निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे अंकित प्रभूजी शेंडे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, वेलतूर हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २०० निपा किंमती ८,०००/—रूपये आणि एक होंडा शाईन १२४ मोटरसायकल क्र. एम एच—४०/डी के—७४२४ किंमती ८०,०००/—रू असा एकुण किंमती ८८,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी अंकित प्रभूजी शेंडे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, वेलतूर याचेविरूध्द**

**पोलीस स्टेशन वेलतूर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २१/०७/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, पोस्टे सावनेर हद्दीतील मौजा न्यु गुजरखेडी सावनेर येथे एक इसम स्वत:जवळ धारदार शस्त्र बाळगुन दहशत पसरवित आहे. नमुद माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले असता आरोपी नामे अहंत निलेश डोंगरे हा तलवार घेवुन फिरत होता तसेच आता तो घरी गेला आहे अशी माहीती पोलीसांना समजली. पोलीसांनी **अहंत निलेश डोंगरे, वय २० वर्ष, रा. शंकुतला नगर, नाग मंदिराचे मागे, न्यु गुजरखेडी सावनेर, ता. सावनेर याचे घराची झडती घेतली असता त्याचे घरातुन एक धारदार लोखंडी धारदार टोकदार तलवार मिळुन आली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष एक धारदार लोखंडी धारदार टोकदार तलवार जप्त केली. नमुद प्रकरणी आरोपींविरूद्ध पोस्टे सावनेर येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

दिनांक २२/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी

दारू तसेच वाहन असा एकुण १,००,२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) हिंमतसिंग कर्नलसिग अंधरेले, रा. सरदार मोहल्ला, पंचवटी काटोल, जि. नागपूर २) ०४ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** आरोपी चरनदास रमेशराव बारई, वय ४२ वर्ष, रा. कुभांरपुरा, नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी हरीष गुलाबराव गुरव, रा. मोहपा, ता. कळमेश्वर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद येथे** आरोपी १) सागर सुखदेवजी गौरखेडे, वय ३२ वर्ष, रा. वॉर्ड क्र. १, रामपुरी, ता. सावनेर २) सुखदेव गौतम बागडे, वय ६५ वर्ष, रा. वॉर्ड क्र. ०२, मंगसा ता. सावनेर ३) शाम देवाजी नारनवरे, वय ४५ वर्ष, रा. वॉर्ड क्र. ०३, ढालगाव खैरी, ता. सावनेर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे महिला** आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी दिलीप तेजराम कोहळे, वय ४९ वर्षे, रा. वार्ड क्र २, चानपा सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नागसेन नामदेव भवसागर, वय ५२ वर्षे, रा. माथनी, त. मौदा यांचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी अंकित प्रभूजी शेंडे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, वेलतूर यांचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी कवडु रामप्रसाद पवार, वय ६५ वर्ष, रा. गरडापार, ह. मु. वासी कॅनलजवळ, ता. भिवापुर, जि. नागपुर यांचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३१५९० मिली देशी दारू, ७० लिटर मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण १,००,२४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने